# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024





१) माजी सैनिकांचा सत्कार करताना प्रशांत कदम, समवेत संजीव चव्हाण, डॉ. एस. डी. पवार व डॉ. विद्या पाटील. २) चित्तथरारक कसरती सादर करताना विद्यार्थी.

# बी. डी. कॉलेजतर्फे माजी सैनिकांचा सन्मान कौतुकास्पद : कदम

▲ पाटण, दि. २८ : वीरमाता, वीरपत्नी, त्याचबरोबर सैनिकांचे देशासाठीचे योगदान व त्याग न विसरता येण्यासारखे आहे. त्यांच्यामुळेच आज आपण सुरक्षित आहोत. मात्र माजी सैनिकांची केवळ २६ जानेवारी व १५ ऑगस्ट रोजीच आठवण येते, अशी खंत व्यक्त करत माजी सैनिकांच्या अनेक अडचणी आहेत. त्यांचे प्रश्न केवळ कागदावरच राहिले आहेत. ते सोडवण्यासाठी सर्वांनी संघटितपणे एकत्रित आले पाहिजे. सातारा जिल्हा सैनिक फेडरेशन यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. बी. डी. सी. कॉलेजने वीरमाता, वीरपत्नीसह आजी-माजी सैनिकांच्या सन्मानार्थ आयोजित केलेला कार्यक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन सातारा जिल्हा सैनिक फेडरेशनचे अध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्यावतीने बी. डी. सी. महाविद्यालय, आयक्युसी व पाटण रोटरी क्लबच्यावतीने पाटण तालुक्यातील आजी-माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी यांच्या सत्कार समारंभप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक संजीव चव्हाण होते. यावेळी पाटण रोटरीच्या अध्यक्षा डॉ. विद्या पाटील, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, लेफ्टनंट संतोष पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशांत कदम म्हणाले, पाटण बी. डी. कॉलेजची विद्यार्थिनीची दिल्लीत होणाऱ्या परेडसाठी निवड होणे ही पाटण तालुक्याच्यादृष्टीने अभिमानास्पद गोष्ट आहे. बी. डी. कॉलेजमध्ये पोलीस भरतीसह मिल्ट्री भरतीचे प्रशिक्षण दिले जाते ही आनंदाची बाब आहे. माजी सैनिकांनीही अशा चांगल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे गरजेचे आहे. देशासाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांची आठवण म्हणून माजी सैनिकांनी पुढील तरुण पिढीला सांगून आपली यशोगाथा त्यांच्यापुढे मांडली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

संजीव चव्हाण म्हणाले, सैनिक सीमेवर डोळ्यात तेल घालून देशाचे रक्षण करत असल्यामुळेच आज आपण सर्वजण सुरक्षित आहोत. त्यांची देशसेवा प्रत्येक भारतीय नागरिकाने लक्षात ठेवली पाहिजे. त्यांच्या कायम ऋणात राहिले पाहिजे. तुमचे आम्ही काही तरी देणे लागतो या हेतूनेच आजचा कार्यक्रम आयोजित केला आहे. माजी सैनिकांसाठी महाविद्यालयामार्फत काही करण्यासारखे असेल तर ते आम्हाला जरूर सांगा. देशाचे आदर्श नागरिक या महाविद्यालयातून घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी कोयना एज्युकेशन सोसायटीमधील विविध शाळांचे देशभक्तिपर गीतांचे आयोजन केले होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बी. डी. कॉलेजतर्फे आजी-माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला तसेच पाटण रोटरी क्लबतर्फे सैनिकांना भेटवस्तू देण्यात आली. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी स्वागत केले. प्रा. पी. आय. पाटणकर व प्रा. ए. एल. शिर्के यांनी सूत्रसंचालन केले. वीरमाता, वीरपत्नी व माजी सैनिक सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. डी. डी. थोरात यांनी केले. लेफ्टनंट डॉ. एस. एस. कुंभार यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

### वॉर डेमोचे सादरीकरण

याप्रसंगी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील एनसीसी रायफल ड्रीलच्या विद्यार्थ्यांनी परेड व चित्तथरारक कसरती करून दाखवल्या तसेच वॉर डेमोही सादर केला. डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या हा वॉर डेमो पाहण्यासाठी महाविद्यालयात मोठी गर्दी झाली होती. सातारा जिल्ह्यात बी. डी. कॉलेज या एकमेव महाविद्यालयात प्रतिवर्षी अशाप्रकारचा कार्यक्रम होत असतो. यावेळी डेमोत सहभागी झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचे आजी-माजी सैनिकांसह उपस्थित सर्वांनीच कौतुक केले.

दैनिक - ऐक्य
दिनांक - 29/01/24
वार - सोमवार
पान नं - 08